पंडित दीनदयाल उपाध्याय शिक्षण संस्था छत्रपती संभाजीनगर संचलित

# श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय फुलंब्री

## संलग्न - डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर

# राष्ट्रीय सेवा योजना

# नियमित कार्यक्रम
# वार्षिक अहवाल

## शैक्षणिक वर्ष २०२२-२३

## १. राष्ट्रध्वज वाटप कार्यक्रम

भारतीय स्वातंत्र्याला ७५ वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त संपूर्ण देशभर स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा केला जात आहे. त्याचाच एक भाग म्हणून दिनांक 13 ते १५ ऑगस्ट २०२२ हे तीन दिवस 'हर घर झेंडा' हा उपक्रम राबविण्याच्या व त्याला प्रसिद्धीच्या सूचना शासनाकडून देण्यात आलेल्या होत्या. त्या अनुषंगाने दिनांक १० ऑगस्ट २०२२ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाने 'हर घर झेंडा आवाहन कार्यक्रम' विद्यापीठ नाट्यगृहात आयोजित केला होता. या कार्यक्रमाला महाविद्यालयातील प्राचार्य व राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी यांना निमंत्रित केले होते. या कार्यक्रमाला श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय फुलंब्री येथील राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी प्रा.डॉ. रामकिशन लोमटे उपस्थित होते. विद्यापीठाच्या वतीने प्रातिनिधिक स्वरुपात वाटप केलेला राष्ट्रध्वज त्यांनी स्वीकारला. या कार्यक्रमाला उपस्थित जिल्हाधिकारी सुनील चव्हाण यांनी 'हर घर झेंडा' कार्यक्रमाला प्रसिद्धी दयावी व महाविद्यालयांनी राष्ट्रध्वज वाटप कार्यक्रम घ्यावा अशी अपेक्षा व्यक्त केली.

श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय फुलंब्री येथे राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने दिनांक १२ ऑगस्ट २०२२ रोजी 'हर घर झेंडा' या कार्यक्रमाला प्रसिद्धी देण्याच्या उद्देशाने राष्ट्रध्वज वाटप कार्यक्रम आयोजित केला. या प्रसंगी प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी यांना राष्ट्रध्वज वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाला प्राचार्य डॉ. सुभाष टकले यांच्यासह प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.



राष्ट्रध्वज वाटप करताना प्राचार्य डॉ. सुभाष टकले




राष्ट्रध्वज वाटप कार्यक्रमात सहभागी विद्यार्थी

## २. चित्र प्रदर्शन

दिनांक १२ ऑगस्ट २०२२ रोजी श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय फुलंब्री येथे राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सव वर्षाच्या निमित्ताने भारतीय स्वातंत्र्य आंदोलनातील क्रांतिकारक व स्वातंत्र्य सेनानी यांची माहिती देणारे चित्र प्रदर्शन लावण्यात आले. श्री संत सावता गुरुकुलाचे प्रधानाचार्य श्री संदीप व्यवहारे व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुभाष टकले यांच्या हस्ते चित्र प्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात आले. या चित्र प्रदर्शनाला प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी यांनी भेटी दिल्या. हे चित्र प्रदर्शन दिनांक 13 ते १५ ऑगस्ट २०२२ हे तीन दिवस चालले. भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी असंख्य देशभक्तांनी आपले योगदान दिले. त्यावेळी हजारो देशभक्त हुतात्मा झाले. देशप्रेमाने भारावून जावून अनेकांनी आपल्या कौटुंबिक जीवनाचा त्याग करून स्वातंत्र्य आंदोलनात भाग घेतला. शेकडो देशभक्तांनी आपल्या जीवाचे बलिदान दिले. भारत स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करीत आहे. भारतला परकियांच्या गुलामगिरीतून मुक्त करणाऱ्या देशभक्तांच्या कार्याची व विचारांची ओळख नवीन पिढीला व्हावी यासाठी महाविद्यालयात चित्र प्रदर्शन लावण्यात आले.




चित्रप्रदर्शन पाहताना शिक्षक व विद्यार्थी




चित्रप्रदर्शन पाहताना शिक्षक व विद्यार्थी



चित्रप्रदर्शन पाहताना विद्यार्थी

## ३. वृक्षारोपण व श्रमदान

**दिनांक 15 ऑगस्ट 2022 रोजी स्वातंत्र्य दिनाच्या निमित्ताने व भारतीय अमृत महोत्सव वर्षाच्या निमित्ताने मौजे दरेगाव (दरी) येथे राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने शाळेसमोरील गायरान जमिनीवर वृक्षारोपण करण्यात आले. कडुलिंब, चिंच, जांभूळ व  मोहाची वृक्ष रोपे वृक्षांची रोपे लावण्यात आली. यावेळी महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रमाधिकारी डॉ. रामकिशन लोमटे, महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. पांडुरंग कल्याणकर, दरेगाव (दरी) गावातील सरपंच श्री गुणाजी मालोदे, माजी सरपंच श्री बाजीराव मालोदे, श्री शामराव अण्णा मालोदे (चेअरमन, सेवा सहकारी सोसायटी फुलंब्री) तसेच उपसरपंच श्री गोपीनाथ मालोदे श्री धनाजी दुधे यांच्यासह इतर गावकरी व महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागातील स्वयंसेवक उपस्थित होते. यावेळी ग्रामस्थांना व्यक्तिगत लावण्यासाठी सुद्धा जांभूळ वृक्ष रोपे वाटप करण्यात आले.**


GPS Map Camera
Phulambri, Maharashtra, India
3FH6+QW8, Phulambri, Maharashtra 431111, India
Lat 20.077803°
Long 75.462882°
15/08/22 11:59 AM
Google


राष्ट्रीय सेवा योजना विभाग




राष्ट्रीय सेवा योजना विभाग


राष्ट्रीय सेवा योजना विभाग


राष्ट्रीय सेवा योजना विभाग
GPS Map Camera
Phulambri, Maharashtra, India
3FH6+QW8, Phulambri, Maharashtra 431111, India
Lat 20.077786°
Long 75.463408°
15/08/22 11:52 AM
Google

## ४. राष्ट्रीय सद्भावना दिवस

दिनांक 20 ऑगस्ट 2022 रोजी भारताचे माजी पंतप्रधान कै. राजीव गांधी यांचा जयंती दिवस भारतात सद्भावना दिवस म्हणून पाळला जातो. यानिमित्ताने महाविद्यालयात सद्भावना दिवस साजरा करण्यात आला. यावेळी सद्भावना प्रतिज्ञा घेण्यात आली.

<u>सद्भावना दिवस प्रतिज्ञा</u>

" मी अशी प्रतिज्ञा करतो / करते की, मी जात, वंश, धर्म, प्रदेश किंवा भाषा विषयक भेद न करता सर्व भारतीय जनतेचे भावनिक ऐक्य आणि सामंजस्य यासाठी काम करीन. मी आणखी अशी प्रतिज्ञा करतो / करते की, आमच्यामधील वैयक्तिक किंवा सामुहिक स्वरूपाचे सर्व प्रकारचे मतभेद मी हिंसाचाराचा अवलंब न करता विचार विनिमय करून व संविधानिक मार्गानी सोडवीन."




GPS Map Camera
Phulambri, Maharashtra, India
3CVG+WHW, MH MSH 8, Phulambri, Maharashtra 431111, India
Lat 20.094867°
Long 75.42633°
20/08/22 11:33 AM
Google


GPS Map Camera
Phulambri, Maharashtra, India
3CVG+WHW, MH MSH 8, Phulambri, Maharashtra 431111, India
Lat 20.09487°
Long 75.426328°
20/08/22 11:33 AM
Google

## ५. राष्ट्रीय सेवा योजना दिवस

दिनांक 24 सप्टेंबर 2022 रोजी महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना दिवसाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांसाठी उद्बोधन वर्ग घेण्यात आला. या कार्यक्रमात राष्ट्रीय सेवा योजना संबंधी विद्यार्थ्यांना माहिती देण्यात आली. राष्ट्रीय सेवा योजनेची सुरुवात, प्रेरणा, बोधचिन्ह, घोषवाक्य यासंबंधी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक म्हणून सामाजिक कार्य करण्याची संधी आहे, त्यासाठी जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी सहभाग घ्यावा व स्वयंसेवक म्हणून नोंदणी करावी असे आवाहन उपस्थित विद्यार्थ्यांना करण्यात आले. या कार्यक्रमास प्रमुख मार्गदर्शक म्हणून महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे माजी कार्यक्रमाधिकारी व उपप्राचार्य डॉ. पांडुरंग कल्याणकर, प्रा. डॉ. नितीन माळेगावकर, डॉ. संजीवकुमार पांचाळ हे उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ. रामकिशन लोमटे यांनी केले. सहाय्यक कार्यक्रमाधिकारी डॉ. राजश्री पवार यांनी आभार यांनी मानले. अध्यक्षीय समारोप राष्ट्रीय सेवा योजना सल्लागार समिती सदस्य डॉ. संजीवकुमार पांचाळ यांनी केला.



राष्ट्रीय सेवा योजना दिवस-मार्गदर्शन करताना प्रा. डॉ. नितीन मालेगावकर



राष्ट्रीय सेवा योजना दिवस- मार्गदर्शन करताना डॉ. पांडुरंग कल्याणकर

## ६. श्रमदान

महात्मा गांधी जयंती व लाल बहादूर शास्त्री जयंती निमित्त श्रमदान दिनांक 2 ऑक्टोबर 2022 रोजी श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय फुलंब्री येथे महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री जयंतीच्या निमित्ताने महाविद्यालय परिसरात राष्ट्रीय स्वयं राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने स्वयंसेवकांनी श्रमदान केले परिसरातील गवत व कचरा काढून परिसर स्वच्छ केला त्यानंतर विद्यार्थ्यांना अल्पोपहार देण्यात आला.



परिसरात श्रमदान करताना विद्यार्थी स्वयंसेवक






**परिसरात श्रमदान करताना विद्यार्थी स्वयंसेवक**




**परिसरात श्रमदान करताना विद्यार्थी स्वयंसेवक**

## ७. कायदेविषयक जनजागृती शिबिर

श्री संत सावता माळी महाविद्यालय फुलंब्री येथे दिनांक 11नोव्हेंबर 2022 रोजी जिल्हा विधी सेवा प्राधिकरण अंतर्गत दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर फुलंब्री व महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्यातर्फे कायदेविषयक जनजागृती शिबिर आयोजित करण्यात आले. या शिबिरामध्ये विद्यार्थ्यांना तसेच प्राध्यापक व कर्मचारी यांना कायदेविषयक मार्गदर्शन करण्यात आले. या शिबिरामध्ये राष्ट्रीय शिक्षण दिवस, शिक्षणाचा मुलभूत हक्क, रॅगिंग प्रतिबंध, सायबर क्राईम, मूलभूत कर्तव्य तसेच वैकल्पिक वाद निवारण विषयी सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. कार्यक्रमास श्रीमती व्ही. व्ही. राव जडेजा मुख्य दिवाणी न्यायाधीश फुलंब्री, सहदिवाणी न्यायाधीश श्री डी. एस. देवरे, श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय फुलंब्री चे प्राचार्य डॉ. एस. आर. टकले, सरकारी अभियोग्यता श्री एस. आर. रामेकर, एडवोकेट श्री विजय धनवट  फुलंब्री  वकील संघाचे अध्यक्ष एडवोकेट बाबासाहेब यु. काळे, एडवोकेट एस. एस. काजी, एडवोकेट ए. डी. लहाने, एडवोकेट वि.डी. डांगे, एडवोकेट एन. जी. पवार, एडवोकेट एस. एस. गायकवाड, एडवोकेट पी. टी. थोरात, एडवोकेट शाबाश शेख, एडवोकेट शैलेश आरक, एडवोकेट शंकर भाले, एडवोकेट ए. एस. कापरे यांच्यासह वकील संघातील सर्व सदस्य उपस्थित होते.

याप्रसंगी श्रीमती व्ही. व्ही. राव जडेजा यांनी कायदेविषयक जनजागृती व राष्ट्रीय शिक्षण दिवस याबद्दल सविस्तर मार्गदर्शन केले तसेच श्री डी. एस. देवरे यांनी रॅगिंग प्रतिबंधक कायदा याविषयी विद्यार्थ्यांना सखोल मार्गदर्शन केले. तसेच श्री रवी लोखंडे पोलीस नाईक सायबर क्राईम यांनी सायबर गुन्हे कायदा या विषयी सखोल मार्गदर्शन केले. एडवोकेट पि.टी. थोरात यांनी वैकल्पिक वाद निवारण याविषयी थोडक्यात माहिती दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन एडवोकेट ए. एस. कापरे यांनी केले. श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय फुलंब्री येथील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या सहाय्यक कार्यक्रम अधिकारी श्रीमती प्रा.डॉ. राजश्री पवार यांनी कार्यक्रमास उपस्थित सर्वांचे  आभार मानले. या कार्यक्रमास सर्व सन्माननीय वकील संघ, न्यायालयीन कर्मचारी वर्ग तसेच श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व कर्मचारी उपस्थित होते.




कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व प्रास्ताविक करताना एडवोकेट ए. एस. कापरे




कायदेविषयक मार्गदर्शन करताना श्रीमती व्ही. व्ही. राव जडेजा मुख्य दिवाणी न्यायाधीश फुलंब्री




**श्री डी. एस. देवरे रॅगिंग प्रतिबंधक कायदा याविषयी मार्गदर्शन करताना.**




**एडवोकेट पि.टी. थोरात यांनी वैकल्पिक वाद निवारण याविषयी माहिती देताना.**



## ८. गॅस सुरक्षा प्रशिक्षण

दिनांक 11 नोव्हेंबर 2022 रोजी महाविद्यालयात घरगुती गॅस वापरातील सुरक्षा याविषयी राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या स्वयंसेवकांना तसेच महाविद्यालयातील प्राध्यापक व कर्मचारी यांना प्रशिक्षण देण्यात आले



**श्री जाधव आर. एस. घरगुती गॅस वापरातील सुरक्षा याविषयी माहिती देताना.**




घरगुती गॅस वापरातील सुरक्षा कर्यक्रम

## ९. मतदार नोंदणी, प्रचार व प्रसिद्धी विशेष शिबीर

(विद्यार्थी व महिलांकरिता)



### अहवाल

श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालयातील फुलंब्री येथील राष्ट्रीय सेवा योजना विभाग व तहसील कार्यालय, फुलंब्री यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक 21 नोव्हेंबर 2022 रोजी विद्यार्थी व महिलांकरिता "मतदार नोंदणी, प्रचार व प्रसिद्धी विशेष शिबीर" आयोजित करण्यात आले. यावेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणून फुलंब्री तहसीलचे निवडणूक विभागाचे नायब तहसीलदार श्री अशोक कापसे,

पेशकार श्री हरिश्चंद्र वलेकर, ग्रामसेवक श्री व्हि.एन. डेंगे उपस्थित होते. तसेच फुलंब्रीतील सर्वच भागातील बूथ लेवल अधिकारी (BLO) उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे उपप्राचार्य, डॉ. पांडुरंग कल्याणकर उपस्थित होते.

मतदार नोंदणी विषयी मार्गदर्शन करताना श्री अशोक कापसे म्हणाले की, मतदान हा प्रत्येक नागरीकांचा मूलभूत अधिकार आहे. मताधिकार आपल्याला मिळावा यासाठी मतदान यादीत आपले नाव असणे आवश्यक आहे. प्रत्येक नागरिकाने मताधिकार बजावल्यास भारतीय लोकशाही बळकट होण्यास मदत होईल. वयाची 18 वर्ष पूर्ण केलेल्या सर्व विद्यार्थ्यांनी मतदार नोंदणी करावी. तसेच पुढील निवडणूक प्रक्रियेत महत्त्वपूर्ण सहभाग नोंदवावा, असे आवाहन त्यांनी केले. पेशकार श्री हरिश्चंद्र वलेकर यांनी मतदान प्रक्रियेतील निवडणूक आयोगाची भूमिका स्पष्ट केली. मतदानापासून कोणीही वंचित राहणार नाही हे निवडणूक आयोगाचे ब्रीदवाक्य असल्याचे त्यांनी सांगितले. **मोबाईल वरून मतदान नोंदणी करण्यासाठी votershelpline app विषयी माहिती देण्यात आली.** मतदान नोंदणी फॉर्म वाटप करण्यात आले. त्यानंतर उपस्थित असलेल्या बूथ लेवल अधिकाऱ्यांनी मतदान नोंदणी संबंधी मार्गदर्शन केले. अध्यक्षीय समारोप प्रा.डॉ.पांडुरंग कल्याणकर यांनी केला. मतदानाचा हक्क हा पवित्र हक्क असून आपण प्रत्येक निवडणुकीत मतदान करणे गरजेचे आहे असे त्यांनी विद्यार्थ्यांना सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक, सूत्रसंचलन राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी प्रा.डॉ.रामकिशन लोमटे यांनी केले. तसेच शेवटी त्यांनी उपस्थितांचे आभार मानले. याप्रसंगी प्रा.डॉ.संजीवकुमार पांचाळ, प्रा.विजय पांडे, प्रा.डॉ.मंजुषा नळगीरकर उपस्थित होते. या कार्यक्रमास महाविद्यालयातील एकूण ६७ विद्यार्थी उपस्थित होते.




फुलंब्री तहसीलचे निवडणूक विभागाचे नायब तहसीलदार श्री अशोक कापसे मार्गदर्शन करताना



**उपस्थित विद्यार्थीनी**



**अध्यक्षीय समारोप करताना उपप्राचार्य डॉ.पांडुरंग कल्याणकर**



**राष्ट्रीय सेवा योजना मतदार नोंदणी कार्यक्रम**



**शिबिराला उपस्थित बूथ लेवल अधिकारी (BLO)**

**बातमी - महाराष्ट्र टाईम्स व लोकमत - दि.२३ नोव्हेंबर २०२२**

महाराष्ट्र टाइम्स

# 'मतदाराची भूमिका महत्त्वाची'

**फुलंब्री :** फुलंब्री श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग व तहसील कार्यालय, फुलंब्री यांच्यातर्फे मतदार नोंदणी विशेष शिबिराचे आयोजन करण्यात आले. या वेळी फुलंब्री तहसीलचे नायब तहसीलदार, अशोक कापसे उपस्थित होते, पेशकार वलेकर, ग्रामसेवक विलास डेंगे; तसेच फुलंब्रीतील अधिकारी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे उपप्राचार्य, डॉ. पांडुरंग कल्याणकर उपस्थित होते.

अशोक कापसे म्हणाले, 'मतदान हा प्रत्येक नागरिकांचा मूलभूत अधिकार आहे. मतदानाचा हक्क प्रत्येकाने बजावावा. त्यामुळे समाज आणि राष्ट्र बळकट होण्यास मदत होईल.' यानंतर मतदान नोंदणी अर्ज वाटप करण्यात आले. अध्यक्षीय समारोप प्रा. डॉ. पांडुरंग कल्याणकर यांनी केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन व उपस्थितांचे आभार प्रा. डॉ. रामकिशन लोमटे यांनी मानले. प्रा. डॉ. संजीवकुमार पांचाळ, प्रा. विजय पांडे व महाविद्यालयातील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

लोकमत

हॅलो औरंगाबाद

epaper.lokmat.com २

औरंगाबाद, बुधवार, दि. २३ नोव्हेंबर २०२२

# मतदार नोंदणीकरिता फुलंब्रीत विशेष शिबिर

लोकमत न्यूज नेटवर्क

**फुलंब्री :** येथील संत सावता माळी महाविद्यालयात सोमवारी निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार मतदान नोंदणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यात नवीन मतदारांना नोंदणीसंदर्भात आवाहन करण्यात आले.

फुलंब्री विधानसभा मतदारसंघातील मतदान नोंदणी अधिकारी वर्षाराणी भोसले व सहायक निवडणूक अधिकारी तथा तहसीलदार डॉ. शीतल राजपूत यांच्या पुढाकाराने सोमवारी नवमतदारांना नाव नोंदणी करून घेण्यासाठी नायब तहसीलदार अशोक कापसे यांच्या अध्यक्षतेखाली विशेष शिबिर पार पडले. या कार्यक्रमाला उपप्राचार्य पांडुरंग कल्याणकर, रामकिशन लोमटे, कर्मचारी हरिश्चंद्र वलेकर, ग्रामसेवक विलास ढेंगे, संदीप गोरे आदींची उपस्थिती होती.

# १०. संविधान दिवस – २६ नोव्हेंबर २०२२

श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय फुलंब्री येथे राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने दिनांक २६ नोव्हेंबर २०२२ या संविधान दिन निमित्ताने भारतीय संविधानातील उद्देशपत्रिकेचे सामुहिक वाचन करण्यात आले . राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी प्रा.डॉ. रामकिशन लोमटे यांनी उद्देशपत्रिके वाचन केले त्यानंतर विद्यार्थी, शिक्षक व कर्मचारी यांनी पाठीमागे उद्देशपत्रिका वाचली . यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस.आर.टकले, उपप्राचार्य डॉ. पांडुरंग कल्याणकर, प्रा. डॉ. अश्विन रांजणीकर, डॉ. नितीन माळेगावकर, डॉ. राजश्री पवार, डॉ. गणेश कुलकर्णी, डॉ. सत्तात्रय येडले, डॉ.सुरेश मुंडे डॉ. मंजुषा नळगीरकर डॉ. महेश थोरात, प्रा लोखंडे सर, श्री बाबासाहेब दाभाडे श्री जयराम जाधव श्री रमेश जगधने उपस्थित होते . याबरोबर महाविद्यालयीन शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी विद्यार्थी असे एकूण १०५ जण उपस्थित होते .



उद्देशपत्रिकेचे सामुहिक वाचन करताना विद्यार्थी व शिक्षक



**भारतीय संविधानातील उद्देशपत्रिकेचे सामुहिक वाचन करण्यात आले.**



**भारतीय संविधानातील उद्देशपत्रिकेचे सामुहिक वाचन करण्यात आले.**

## ११. एड्स जागृती चित्र प्रदर्शन

दिनांक १२ ऑगस्ट २०२२ रोजी युवा दिनाच्या निमित्ताने महाविद्यालयात चित्र प्रदर्शन भरविण्यात आले. त्यासाठी तालुका ग्रामीण रुग्णालय फुलंब्री येथील डॉक्टर व नर्स यांनी परिश्रम घेतले.




## १२. जागतिक एडस दिन

महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने दिनांक 1 डिसेंबर 2022 रोजी जागतिक एड्स दिनानिमित्त फुलंब्री ग्रामीण रुग्णालय ICTC विभाग तसेच मराठवाडा ग्रामीण विकास संस्था तसेच मैत्री क्लिनिक आणि श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय फुलंब्री राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने "एच आय व्ही. जनजागृती व माहिती" विषयीचे पोस्टर व मार्गदर्शनाचा कार्यक्रम आयोजन करण्यात आला. राष्ट्रीय सेवा योजना चे समन्वयक प्राध्यापक डॉ. रामकिशन लोमटे प्राध्यापक डॉ. राजश्री पवार तसेच फुलंब्री ग्रामीण रुग्णालय आयसीटीसी विभागाचे श्री संजय चोबे सर श्रीमती संध्या घोळवे मुंडे मॅडम मैत्री क्लिनिकचे वाहिद पटेल लिंक वर्कर सौ. संगीता वाघमारे यांच्या उपस्थितीत आणि मार्गदर्शनाखाली हा एचआयव्ही समुपदेशन आणि मार्गदर्शन चित्र प्रदर्शनाचा कार्यक्रम घेण्यात आला. याप्रसंगी महाविद्यालयातील प्राध्यापक व ६८ विद्यार्थी उपस्थित होते.




चित्र प्रदर्शन पहाताना विद्यार्थी



चित्र प्रदर्शन पहाताना विद्यार्थी

**१३. आव्हान -आपत्कालीन शिबीर निवड चाचणीत विद्यार्थी सहभाग:-**

आव्हान  या राज्यस्तरीय आपत्कालीन व्यवस्थापन प्रशिक्षण शिबीर दि.१९ ते २८ डिसेंबर २०२२ या कालावधीत कवयत्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव येथे नियोजित असल्यामुळे शिबिरात सहभागी होण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजना विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद येथे निवड चाचणी घेण्यात आली. या  निवड चाचणी साठी श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय फुलंब्री येथील ४ विद्यार्थी सहभागी झाले.  निवड चाचणीत  कु. मुक्ता भूषण चव्हाण, कु.स्वाती दादासाहेब नजन, कु. जागृती कल्याणदास वैष्णव, पप्पू सोमीनाथ मैंद हे चार विद्यार्थी सहभागी झाले. यापैकी दोन विद्यार्थिनी राखीव ठेवल्यामुळे त्यांना संबधित शिबिरात सहभागी होता आले नाही.

## १४. उत्कृष्ट स्वयंसेवक पुरस्कार: -

शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मध्ये राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने उत्कृष्ट स्वयंसेवक व उत्कृष्ट स्वयंसेविका  पुरस्कार देण्यात आला. महाविद्यालयाच्या वार्षिक स्नेह सम्मेलन समारोप समारंभात श्री चंद्रमणी बनसोडे व कु. ऋतुजा अंभोरे यांना हा पुरस्कार प्रमुख अतिथी प्राचार्य डॉ. प्रदीप जब्दे , प्रा.डॉ. अनिरुद्ध मोरे यांच्या हस्ते देण्यात आला.





## १५. संत गाडगेबाबा जयंती:-

दिनांक २३ फेब्रुवारी २०२३ रोजी सकाळी १०:०० वाजता श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने संत गाडगेबाबा जयंती साजरी करण्यात आली. याप्रसंगी प्रमुख वक्ते प्रा.डॉ. नितीन माळेगावकर यांनी संत गाडगेबाबा यांच्या कार्याविषयी माहिती दिली. संत गाडगेबाबा यांनी समाज प्रबोधनाचे कार्य केले. गावोगावी फिरून त्यांनी व्यसन मुक्ती,

अंधश्रद्धा निर्मुलन व ग्राम स्वच्छता या संबंधी जनजागृती केली. संत गाडगेबाबा यांच्या नावाने महाराष्ट्र शासनाने विविध योजना सुरु केलेल्या आहेत याविषयी माहिती त्यांनी दिली. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. सुभाष टकले हे होते.कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.






संत गाडगेबाबा जयंती साजरी करण्यात आली. याप्रसंगी प्रमुख वक्ते प्रा.डॉ. नितीन माळेगावकर यांनी संत गाडगेबाबा यांच्या कार्याविषयी माहिती दिली.




संत गाडगेबाबा जयंती




संत गाडगेबाबा जयंती

## १६. जलस्त्रोतांचे संवर्धन – व्याख्यान कार्यक्रम :-

राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने महाविद्यालयात दिनांक १४ मार्च २०२३ रोजी दुपारी १२:३० ते २:३० या वेळेत  जलस्त्रोतांचे संवर्धन या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले. या व्याख्यानासाठी व्याख्याते म्हणून प्रा. अरुण परदेशी (संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय फुलंब्री) तसेच कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून प्रा. आकाश सोनवणे हे उपस्थित होते.

प्रा.परदेशी यांनी 'जलस्त्रोतांचे संवर्धन' या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. जल हे जीवन आहे. प्रत्येक सजीवाच्या जीवनात पाण्याचे खूप महत्व आहे. पाण्याशिवाय सजीवाचे अस्तित्व राहू शकत नाही. पृथ्वीवरील पाणी हे द्रव, बाष्प व बर्फ या रुपात असते. पृथ्वीवर ७१ टक्के पृष्ठ भाग पाण्याने व्यापलेला आहे. परंतु वापरासाठी योग्य पाणी अत्यंत कमी आहे. आपल्याला वारंवार पाण्याची टंचाई जाणवते. वारंवार दुष्काळाचा सामना करावा लागतो. आपण पावसाच्या पाण्याची योग्य साठवण व उपलब्ध पाण्याचे संवर्धन करणे गरजेचे आहे. त्यासाठी प्रत्येकाने पाण्याचा काटकसरीने वापर करणे, पुनर्वापर करणे आवश्यक आहे. अशा प्रकारे प्रा. परदेशी यांनी जलस्त्रोतांचे संवर्धन कसे करावे याची माहिती दिली. अध्यक्षीय समारोप प्रा. आकाश सोनवणे यांनी केला.  राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रमाधिकारी डॉ. रामकिशन लोमटे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. बी. एस्सी. प्रथम वर्षाचा विद्यार्थी श्री विजय पेरकार यांनी आभार मानले.




जलस्त्रोतांचे संवर्धन या कार्यक्रमात प्रास्ताविक करताना डो. रामकिशन लोमटे




**जलस्त्रोतांचे संवर्धन या विषयावर मार्गदर्शन करताना प्रा. अरुण परदेशी**




जलस्त्रोतांचे संवर्धन कार्याक्रमास उपस्थित विद्यार्थी




**जलस्त्रोतांचे संवर्धन या विषयावर मार्गदर्शन करताना प्रा. अरुण परदेशी**

=================

सादरकर्ते

| | | |
|---|---|---|
| कार्यक्रमाधिकारी | सहाय्यक कार्यक्रमाधिकारी | प्राचार्य |
| प्रा. डॉ. रामकिशन लोमटे | डॉ. राजश्री पवार | डॉ.सुभाष टाकले |

पंडित दीनदयाल उपाध्याय शिक्षण संस्था छत्रपती संभाजीनगर संचलित

# श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय

# फुलंब्री

संलग्न - डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ

छत्रपती संभाजीनगर

# राष्ट्रीय सेवा योजना

# विशेष शिबीर

‘युवकांचा ध्यास ग्राम-शहर विकास’

दि.६ ते १२ जानेवारी २०२३

# मौजे - गणोरी

ता. फुलंब्री जि. छत्रपती संभाजीनगर

अहवाल

शैक्षणिक वर्ष २०२२-२३

## राष्ट्रीय सेवा योजना शिबिर गावाची निवड:-

शैक्षणिक वर्ष २०२२-२३ या वर्षातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे विशेष शिबिर घेण्यासाठी गावाची निवड करणे आवश्यक होते. त्या दृष्टीने दिनांक ३० नोव्हेंबर २०२२ रोजी कार्यक्रमाधिकारी प्रा.डॉ. रामकिशन लोमटे, सहाय्यक कार्यक्रमाधिकारी प्राध्यापिका डॉ. राजश्री पवार व राष्ट्रीय सेवा योजना विभागातील स्वयंसेवक यांची बैठक घेतली. विविध गावांचे प्रस्ताव समोर आले. त्याविषयी चर्चा करण्यात आली. त्यानंतर मौजे गणोरी ता. फुलंब्री या गावाला प्राधान्य दयावे असे ठरले.

## शिबिर पूर्व गावभेट :-

दिनांक १ डिसेंबर २०२२ रोजी राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रमाधिकारी डॉ. रामकिशन लोमटे व डॉ. राजश्री पवार यांनी गणोरी गावाला भेट दिली. राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे विशेष शिबिर घेण्यासाठी आवश्यक सुविधांची पाहणी केली. गावचे सरपंच, सदस्य, ग्रामसेवक व नागरिक यांच्याशी संवाद साधला. त्यानंतर प्राचार्य डॉ. एस. आर. टकले यांच्या सोबत चर्चा करून गणोरी या गावाची विशेष शिबिरासाठी निवड करण्यात आली. दिनांक २२ डिसेंबर २०२२ कार्यक्रमाधिकारी डॉ. रामकिशन लोमटे यांनी गणोरी गावात जाऊन शिबिराचे नियोजन केले. दिनांक ६ जानेवारी २०२३ ते १२ जानेवारी २०२३ हा शिबीर कालावधी निश्चित करण्यात आला.

## आगमन :-

शिबिर प्रारंभ होण्याच्या एक दिवस अगोदर म्हणजे दिनांक ५ जानेवारी २०२३ रोजी कार्यक्रमाधिकारी डॉ. रामकिशन लोमटे व स्वयंसेवक गणोरी गावात पोहोचले. दुसऱ्या दिवशी होणाऱ्या उद्घाटन समारंभाची तयारी केली.

## ⁕ उद्घाटन समारंभ ⁕

शुक्रवार, दिनांक:६ जानेवारी २०२३, सकाळी १० वा.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद संलग्नित व पंडित दीनदयाल उपाध्याय शिक्षण संस्था संचालित, श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय फुलंब्री येथील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने सात दिवसाचे निवासी शिबीर मौजे गणोरी ता. फुलंब्री जि. औरंगाबाद येथे दि.६ जानेवारी ते १२ जानेवारी २०२३ या कालावधीत संपन्न झाले. शिबिराची मुख्य संकल्पना होती, "युवकांचा ध्यास ग्राम - शहर विकास." या सत्रासाठी प्रमुख उपस्थिती गणोरी येथील सरपंच सौ. सरलाताई संतोष पा. तांदळे, तसेच गणोरी गावातील प्रतिष्ठित नागरिक श्री संतोष पा. तांदळे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सुभाष टकले हे उपस्थित होते.




**राष्ट्रीय सेवा योजना गीत- 'बलसागर भारत होओ' सादर करताना सवयंसेविका कु.राधा मिसाळ, कु. आरती प्रधान, कु. ऋतुजा अंभोरे.**




**मा. श्री. किशोर शितोळे यांचे पुष्प गुच्छ देवून स्वागत करताना सवयंसेवक श्री ऋषिकेश अंभोरे.**

शिबिराचे उद्धाटन दि.६ जानेवारी २०२३ रोजी सकाळी १०:०० वाजता मा. श्री. किशोर शितोळे (सदस्य, राष्ट्रीय सेवा योजना महाराष्ट्र राज्य सल्लागार समिती व अध्यक्ष, देवगिरी नागरी सहकारी बँक) यांच्या हस्ते झाले. उद्धाटन समारंभाच्या प्रारंभी अतिथीनी संत सावता महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेविका कु.आरती प्रधान, कु. राधा मिसाळ, व कु.ऋतुजा अंभोरे यांनी राष्ट्रीय सेवा योजना गीत गायिले. त्यानंतर पुष्प गुच्छ देवून पाहुण्यांचे स्वागत करण्यात आले. प्रास्ताविक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सुभाष टकले यांनी केले. गणोरी गावच्या सरपंच सौ. सरलाताई संतोष पा. तांदळे मनोगत व्यक्त करताना

म्हणाल्या, महाविद्यालयाने आमच्या गावात शिबीर आयोजित केले आहे. गावाच्या वतीने आपले स्वागत आहे. शिबिराला गावाकडून आवश्यक ते सर्व सहकार्य करण्याची त्यांनी हमी दिली. गावातील प्रतिष्ठित नागरिक श्री संतोष पा.तांदळे मनोगत व्यक्त करताना म्हणाले, आमचे शिबिराला पूर्ण सहकार्य राहील. आम्ही सुद्धा शिबिराच्या उपक्रमात सहभागी होणार आहोत.




**प्रतिष्ठित नागरिक व सामाजिक व राजकीय कार्यकर्ते श्री संतोष पा.तांदळे मनोगत व्यक्त करताना.**

शिबिराचे उद्घाटक मा. श्री. किशोर शितोळे संबोधित करताना म्हणाले, राष्ट्रीय सेवा योजना शिबिरात स्वयंसेवकानी उत्साहाने सहभागी झाले पाहिजे. सात दिवसाच्या निवासी शिबिरात गावकऱ्यांसोबत मैत्री करावी. गावातील लोकांना शिबिराच्या उपक्रमात सहभागी करावे. शिबिराच्या मुख्य विषयाला अनुसरून काम करावे. शिबिरात विद्यार्थ्यांना आपले व्यक्तिमत्व विकसित करण्याची संधी आहे. स्वयंसेवकानी गावकऱ्या कडून अनेक गोष्टी शिकाव्यात तसेच विविध सरकारी योजनाची त्यांना माहिती गावकऱ्यांना दयावी, अशा प्रकारे त्यांनी विद्यार्थी स्वयंसेवकाना मार्गदर्शन केले.



**शिबिराचे उद्घाटक मा. श्री. किशोर शितोळे विद्यार्थी स्वयंसेवकाना मार्गदर्शन करताना.**

उद्घाटन समारंभासाठी अध्यक्ष म्हणून पंडित दीनदयाल उपाध्याय शिक्षण संस्थेचे सचिव श्री शामसुंदर नाईक हे लाभले होते. अध्यक्षीय समारोप करताना ते म्हणाले, शिबिराच्या माध्यमातून आपल्यासमोर विविध वक्ते येणार आहेत. त्यांचे आपल्याला मार्गदर्शन मिळणार आहे. आता गावाचे महत्त्व वाढले आहे. मागील काही वर्षात आपण खूप प्रगती करीत आहोत. परंतु त्यासोबत अनेक समस्या सुद्धा निर्माण होत आहेत. पर्यावरणाची एक गंभीर समस्या निर्माण झालेली आहे. या शिबिराच्या उद्घाटन समारंभाला महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक, प्राध्यापक, कर्मचारी व गावकरी सहभागी झाले.




**पंडित दीनदयाल उपाध्याय शिक्षण संस्थेचे सचिव श्री शामसुंदर नाईक अध्यक्षीय समारोप करताना.**

दिनांक : ६ जानेवारी २०२३ शुक्रवार रोजी शिबिराच्या उद्घाटनानंतर महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना शिबिरात सहभागी स्वयंसेवक युवक-युवती व कार्यक्रमाधिकारी यांनी शिबिराविषयी जनजागृतीसाठी गणोरी गावात दिंडी काढली. यावेळी स्वयंसेवकांनी ग्राम विकासाच्या घोषणा दिल्या. **“राष्ट्रीय सेवा योजना आयी है, नयी रोशनी लायी है” “आपला गाव- स्वच्छ गाव- सुंदर गाव” “स्वच्छता पाळा रोगराई टाळा” “आहार घ्या सत्वयुक्त, गाव करा कुपोषण मुक्त” “बालविवाह टाळा, विवाहाचा नियम” “नखे कापा बोटांची, व्याधी टाळा पोटाची”** अशा घोषणांनी गावकऱ्यांचे लक्ष वेधून घेतले.




**राष्ट्रीय सेवा योजना जनजागृती दिंडी.**




राष्ट्रीय सेवा योजना जनजागृती दिंडी.



राष्ट्रीय सेवा योजना जनजागृती दिंडी.

**बौद्धिक सत्र- दिनांक : ६ जानेवारी २०२३, शुक्रवार वेळ: दुपारी ३ ते ४**
**विषय :- " पर्यावरण आणि कचरा व्यवस्थापन "**
**वक्ते :- प्रा. डॉ. गणेश कुलकर्णी**

दिनांक 6 जानेवारी 2020 रोजी दुपारच्या बौद्धिक सत्रात डॉ. गणेश कुलकर्णी यांचे पर्यावरण व कचरा व्यवस्थापन या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले. गच्चीवरील बाग व कचरा व्यवस्थापन या अनेक प्रयोग करणारे डॉ. गणेश कुलकर्णी म्हणाले की आज पर्यावरण बदलत चाललेले आहे. जागतिक तापमान वाढ होत आहे. आपण पाणी, हवा, माती व ध्वनी याचे प्रदूषण करत आहोत. या प्रदूषणाचे वाईट परिणाम सजीव सृष्टीवर होत आहेत. कचरा ही एक आज गंभीर समस्या निर्माण झालेली आहे. कचरा रस्त्यावर आणि मोकळ्या जागेत विखुरल्यामुळे नदी, नाले, माती व हवा यांना प्रदूषित करतो. त्यामुळे रोगराई पसरते. हवेचे प्रदूषण निर्माण होते. माती प्रदूषित होते, पाणी प्रदूषित होते. हे टाळण्यासाठी आपण कचऱ्याचे व्यवस्थापन केले पाहिजे. कचऱ्याचे विभाजन करून ओला कचरा वेगळा व न कुजणारा कचरा वेगळा केला पाहिजे. प्रदूषण टाळण्यासाठी कचऱ्यापासून कंपोस्ट खत आपण घरी बनवू शकतो. स्वत: घरी बनविलेल्या सेंद्रिय खताच्या निर्मितीचे प्रयोग त्यांनी सांगितले. याबरोबरच गच्चीवरील बागेचा प्रयोगही त्यांनी व्याख्यानादरम्यान सांगितला. या सत्राच्या अध्यक्षस्थानी प्रा . डॉ . रामकिशन लोमटे हे होते . सूत्रसंचालन सूत्रसंचालन ऋतुजा कुमारी ऋतुजा अंभोरे यांनी केले.



**डॉ. गणेश कुलकर्णी यांनी पर्यावरण व कचरा व्यवस्थापन विषयावर व्याख्यान देत आहेत.**




**व्याख्याते डॉ. गणेश कुलकर्णी यांचे आभार मानताना कु. ऋतुजा अंभोरे.**

**व्याख्यान सत्र - दिनांक : ६ जानेवारी २०२३ शुक्रवार**
**वेळ: सायं. ७ ते ८:३०**
**विषय :- पर्यावरण बदल**
**वक्ते :- मा. श्री उदय देवळाणकर**

दिनांक 6 जानेवारी 2023 रोजी सायंकाळी 7 ते 8 या वेळेत व्याख्यान सत्रात प्रसिद्ध कृषी अभ्यासक व सल्लागार माननीय श्री उदय देवळाणकर यांचे 'पर्यावरण बदल' या विषयावर व्याख्यान झाले. या वेळी त्यांनी पर्यावरण बदलाचा मानवी जीवनावर, मानवी आरोग्यावर व शेतीवर कसा परिणाम होत आहे याविषयी माहिती दिली. पर्यावरणामध्ये बदल होत आहे, घातक घटक हवेत उत्सर्जित होत आहेत. त्यामुळे पृथ्वीच्या तापमानात वाढ होत आहे. तापमान वाढीचा परिणाम म्हणून पर्यावरण बदलत आहे. कृषी क्षेत्रावर सुद्धा पर्यावरण बदलाचा विपरीत परिणाम होत आहे. कृषी उत्पन्न घटत आहे. पिकावरील रोग वाढत आहेत. परिणामतः रासायनिक खते व कीटकनाशके यांचा वापर वाढत आहे. रासायनिक खते व कीटकनाशके यांचा वापर कमी करून सेंद्रिय शेती करणे गरजेचे आहे. पारंपारिक शेतीतील अनेक उपयुक्त गोष्टी त्यांनी सांगितल्या. याबरोबरच पर्यावरण पूरक शेती करणे गरजेचे आहे असे मार्गदर्शन त्यांनी गावकरी व विद्यार्थी यांना केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन स्वयंसेवक श्री ऋषिकेश अंभोरे यांनी केले. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान गणोरी गावातील नागरिक श्री संतोष हातकंगणे यांनी भूषविले. पाहुण्यांचे आभार स्वयंसेवक श्री चंद्रमणी बनसोडे यांनी मांडले. व्याख्यानानंतर कृषी अभ्यासक व सल्लागार माननीय श्री उदय देवळाणकरयांनी गावकरी व विद्यार्थी यांच्यासोबत अनौपचारिक संवाद सुद्धा साधला.



**माननीय श्री उदय देवळाणकर यांचे स्वागत करताना स्वयंसेवक श्री अभिषेक झरकर.**




**श्री उदय देवळाणकर यांच्या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करताना स्वयंसेवक श्री ऋषिकेश अंभोरे.**




**माननीय श्री उदय देवळाणकर मार्गदर्शन करताना.**




**माननीय श्री उदय देवळाणकर गावकऱ्यासोबत.**

**बौद्धिक सत्र-दिनांक ७ जानेवारी २०२३ शनिवार**
**वेळ: दुपारी ३ ते ४**
**विषय:- आपले राष्ट्र आणि आपले कर्तव्य**
**वक्ते:- प्रा.डॉ.सुरेश मुंढे**

दुसऱ्या दिवशी दिनांक 7 जानेवारी 2023 वार शनिवार रोजी दुपारी तीन ते चार या वेळेत बौद्धिक सत्रात प्रा. डॉ. सुरेश मुंढे यांचे व्याख्यान झाले. 'आपले राष्ट्र आणि आपले कर्तव्य' या विषयावर त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाला प्राध्यापिका डॉ. राजश्री पवार प्रा. डॉ. दत्तात्रय येडले उपस्थिती होते. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना प्रा.डॉ.सुरेश मुंढे म्हणाले, आपले प्रेम आपल्या गावावर जसे असते तसे आपल्या देशावर असते. भारत ही आपली माता आहे. विश्वात भारताची वेगळी ओळख आहे. जगात राष्ट्रासाठी माता शब्द फक्त भारताला वापरलेला आहे. भारत असा देश आहे ज्यामध्ये सारी दुनिया समाविष्ट आहे. भारताला संघर्षाचा इतिहास लाभलेला आहे तसेच वैभवाचाही इतिहास लाभलेला आहे. प्राचीन भारतात नालंदा व तक्षशिला सारखी विद्यापीठे होती. शिक्षणाची प्राचीन वैभवशाली परंपरा भारताला लाभलेली आहे. आर्यभट्ट यांनी शून्याचा शोध लावला आहे. प्राचीन काळापासून भारताची वैभवशाली संस्कृती सर्वपरिचित आहे. भारत एक महान देश आहे. आज पर्यंत भारताने कोणत्याही देशावर आक्रमण केलेले नाही. भारतावर मात्र आजपर्यंत अनेक प्रक्रियांची आक्रमणे होत आलेली आहेत. भारतातील ज्ञान इतर देशांनी नेलेले आहे. आक्रमकांनी भारतातील विचार व संस्कृती नष्ट करण्याचा प्रयत्न केला पण भारतीय विचार भारतीय संस्कृती आज पर्यंत टिकून राहिलेली आहे. आज भारत जागतिक नेतृत्व करीत आहे. जगातील विविध समस्या सोडविण्यासाठी भारत महत्वपूर्ण भूमिका बजावत आहे. या शब्दात त्यांनी आपले विचार व्यक्त केले .




**बौद्धिक सत्रात मार्गदर्शन करताना प्रा. डॉ. सुरेश मुंढे**

**व्याख्यान सत्र-दिनांक ७ जानेवारी २०२३ शनिवार**

**वेळ: सायं. ७ ते ८:३०**

**विषय - ग्रामविकास**

**वक्ते - मा. श्री हरिभाऊ बागडे (नाना)**

दिनांक ७ जानेवारी २०२३ शनिवार रोजी सायंकाळी ७ ते ८:३०या वेळेत पंडित दीनदयाल उपाध्याय शिक्षण संस्थेचे अध्यक्ष व फुलंब्री विधानसभा मतदारसंघाचे माननीय आमदार श्री हरिभाऊ बागडे नाना यांनी राष्ट्रीय सेवा योजना शिबिरात उपस्थित राहून ग्रामविकास या विषयावर ग्रामस्थ व विद्यार्थी यांना मार्गदर्शन केले. ते म्हणाले शिक्षण हा विकासाचा पाया आहे. दर्जेदार शिक्षणामुळे विद्यार्थ्यांचा, समाजाचा, गावाचा व देशाचा विकास होतो. आज उच्च शिक्षणाची स्थिती अशी आहे की बहुतांश विद्यार्थी पदवी मिळविण्यासाठी शिक्षण घेत आहेत. जेथे कॉपी चालते त्या महाविद्यालयात प्रवेश घेण्यासाठी विद्यार्थी उत्सुक असतात.




**माननीय आमदार श्री हरिभाऊ बागडे नाना - राष्ट्रीय सेवा योजना शिबिरात ग्रामविकास या विषयावर ग्रामस्थ व विद्यार्थी यांना मार्गदर्शन करत आहेत.**



माननीय आमदार श्री हरिभाऊ बागडे नाना - राष्ट्रीय सेवा योजना शिबिरात ग्रामविकास या विषयावर ग्रामस्थ व विद्यार्थी यांना मार्गदर्शन करत आहेत.



माननीय आमदार श्री हरिभाऊ बागडे नाना - राष्ट्रीय सेवा योजना शिबिरात ग्रामविकास या विषयावर ग्रामस्थ व विद्यार्थी यांना मार्गदर्शन करत आहेत.

शिक्षण हे केवळ पदवी मिळविण्यासाठी घेऊ नये. शिक्षणामुळे विद्यार्थ्यांमधील कौशल्याचा विकास होण्याची आवश्यकता आहे. शासनाने आता राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-2020 स्वीकारले आहे. शैक्षणिक धोरणात कौशल्य विकासावर भर दिलेला आहे. शिक्षणातून विद्यार्थी एक चांगला नागरिक घडायला हवा. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास झाला पाहिजे. शिक्षणाच्या माध्यमातून प्रामाणिक व चांगले नागरिक घडविण्याचे काम झाले पाहिजे. आपल्याला चांगले काही करता आले नाही तरी चालेल, पण वाईट करू नये. खोटे बोलणे किंवा खोट्या गोष्टी करण्याची सवय असू नये. ज्याची वागणूक चांगली त्याचे जीवन चांगले व सुखी असते. आपला धर्म, संस्कृती व परंपरा अबाधित ठेवणे आवश्यक आहे. खोट्या गोष्टी करताना लक्षात ठेवाव्या लागतात. खऱ्या गोष्टी लक्षात ठेवण्याची गरज नसते. चुकीच्या संस्कारामुळे माणूस चुकीच्या मार्गाला जातो. माणसे घडविण्यासाठी शिक्षण आहे, शिक्षणाने माणसात सुधारणा झाली पाहिजे. चांगल्या व्यक्तींना मानसन्मान मिळतो. ग्रामीण भागात गुणवत्ता शिक्षणाच्या माध्यमातून विकास करणे शक्य आहे. भारतात प्राचीन काळात गुरुकुल शिक्षण पद्धती होती. नालंदा, तक्षशिला यासारखी विद्यापीठे होती. शून्याचा शोध आर्यभट्ट यांनी लावला. भारतात शेती क्षेत्रात विकासाच्या अनेक संधी उपलब्ध आहेत. ग्रामस्थांनी व गावकऱ्यांनी ठरविले तर आपला गाव सुधारू शकतो. गावाच्या विकासाची चावी ग्रामस्थांच्या हाती आहे. आपल्यातील हेवेदावे बाजूला ठेवून गावाच्या विकासासाठी प्रयत्न केले पाहिजेत. संशोधनात आपण अग्रेसर असले पाहिजे. नवे नवीन प्रयोग राबविले पाहिजेत. समाजाच्या हिताचे देशाच्या हिताचे जे असेल ते आपण शोधले पाहिजे. यशस्वी जीवन जगण्यसाठी आपण चांगले ध्येय ठेवले पाहिजे व चांगल्या मार्गाने मार्गक्रमण केले पाहिजे.

या प्रसंगी गणोरी गावच्या सरपंच सौ.सरलाताई संतोष तांदळे यांनी सुद्धा आपले मनोगत व्यक्त केले. या सत्राचे सूत्रसंचालन कु.ऋतुजा अंभोरे हिने केले. आभार श्री चंद्रमणी बनसोडे यांनी मानले.




**सरपंच सौ.सरलाताई संतोष तांदळे आपले मनोगत व्यक्त करताना.**

**लोकमत**

# गावाचा विकास करण्याची चावी ही ग्रामस्थांच्या हाती - हरिभाऊ बागडे

लोकमत न्यूज नेटवर्क

**फुलंब्री :** गावाच्या विकासाची चावी ग्रामस्थांच्याच हाती असून, यासाठी राजकीय हेवेदावे बाजूला ठेवून एकजूट महत्त्वाची असल्याचे मत आ. हरिभाऊ बागडे यांनी व्यक्त केले. शनिवारी गणोरी येथे आयोजित राष्ट्रीय सेवा योजनेच्या कार्यक्रमात ते बोलत होते.

येथील संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना शिबिराचा शनिवारी दुसरा दिवस होता. या शिबिराला आ. बागडे यांनी भेट दिली.

पुढे बोलताना ते म्हणाले, स्वच्छतेच्या बाबतीत प्रत्येकाने स्वेच्छेने पुढाकार घेतला पाहिजे. स्वयंसेवकांबरोबर ग्रामस्थांचाही सहभाग असावा. श्रम करण्याची सवय विद्यार्थ्यांना लागावी, त्यांच्यावर श्रमसंस्कार व्हावे, हा उद्देश अशी शिबिरे आयोजित करण्यामागे असतो, असे त्यांनी सांगितले.



गणोरी येथे आयोजित कार्यक्रमात बोलताना आमदार हरिभाऊ बागडे.

यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य, डॉ. एस. आर. टकले, संतोष तांदळे, प्रा. डॉ. रामकिसन लोमटे, सरपंच सरला तांदळे, प्रा. डॉ. राजश्री पवार, प्रा. डॉ. पांडुरंग कल्याणकर, प्रा. डॉ. संजीवकुमार पांचाळ, प्रा. डॉ. नितीन माळेगावकर उपस्थित होते.

**सकाळ**



फुलंब्री : गणोरी येथील श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना शिबिरात मार्गदर्शन करताना हरिभाऊ बागडे.

## स्वतःचा चांगुलपणा गुणवत्तेमधून सिद्ध करावा

**फुलंब्री :** स्वतःचा चांगुलपणा आणि शोधवृत्ती गुणवत्तेमधून सिद्ध करावी. त्याचबरोबर चांगला माणूस कसे बनता येईल, याचाही प्रयत्न करावा, असा सल्ला माजी विधानसभा अध्यक्ष तथा फुलंब्रीचे आमदार हरिभाऊ बागडे यांनी दिला आहे. गणोरी येथे सुरू असलेल्या श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना शिबिराच्या दुसऱ्या आयोजित कार्यक्रमात श्री बागडे हे बोलत होते. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य, डॉ.एस. आर. टकले, श्री संतोष तांदळे, विलास उबाळे (मार्केट कमिटी सदस्य) यांची उपस्थिती होती. प्रास्ताविक कार्यक्रमाधिकारी, प्रा. डॉ.रामकिशन लोमटे यांनी केले. ग्रामस्थांच्या वतीने सरपंच सरलाताई तांदळे यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी प्रस्तुत गावचे सुपुत्र श्री गणेश जाधव यांना उदगीर तालुका पत्रकार संघाच्या वतीने मराठवाडा पत्रकारिता पुरस्कार" जाहीर झाल्याबद्दल श्री बागडे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. उपस्थित मान्यवरांचे आभार सहकार्यक्रमाधिकारी प्रा.डॉ.राजश्री पवार यांनी मानले. सूत्रसंचालन स्वयंसेवक चंद्रमनी बनसोडे, श्रद्धा अंभोरे यांनी केले. यावेळी प्रा.डॉ.पांडुरंग कल्याणकर, प्रा. डॉ.संजीवकुमार पांचाळ, प्रा.डॉ.नितीन माळेगावकर उपस्थित होते.

**बौद्धिक सत्र-दिनांक ८ जानेवारी २०२३ रविवार**

**वेळ: दुपारी ३ ते ४**

**विषय:- बालकांची तस्करी**

**वक्ते :- डॉ.दत्तात्रय येडले**

दिनांक ८ जानेवारी २०२३ रविवार रोजी दुपारी ३ ते ४ या वेळेत प्रा. डॉ. दत्तात्रय येडले यांनी "बालकांची तस्करी" या विषयावर व्याख्यान दिले. आपल्या देशात बालकांची तस्करी ही एक गंभीर समस्या आहे. बालकांचे हक्क दुर्लक्षित राहत आहेत. बालकांच्या तस्करीच्या अनेक घटना आपण वर्तमानपत्रात वाचतो. जन्मलेल्या बालकाला उचलून नेले जाते. अनेक बालकांची कामाला लावण्यासाठी खरेदी- विक्री केली जाते. बालकांची तस्करी करून अवयव काढले जातात. अंधश्रद्धापोटी हत्या केली जाते. लग्नासाठी मुलींचे अपहरण केले जाते. अनेक घटना उघड होत नाहीत. उघड झाल्यातर गुन्हेगार सापडत नाहीत. बालकांची सुरक्षा हा अत्यंत महत्वाचा विषय असून गुन्हेगारांना कडक शिक्षेची तरतूद असणे आवश्यक आहे. बालकांची काळजी घेणे हे पालकांचे सुद्धा आद्य कर्तव्य आहे. असे विचार त्यांनी व्यक्त केले.






**प्रा. डॉ. दत्तात्रय येडले यांनी "बालकांची तस्करी" या विषयावर व्याख्यान देत आहेत.**

**व्याख्यान सत्र- दिनांक ८ जानेवारी २०२३ रविवार**

**वेळ: सायं. ७ ते ८:३०**

**" आरोग्य तपासणी व मार्गदर्शन "(मधुमेह, रक्तदाब)**

**डॉ. निलेश लोमटे**

**एम.डी. (मेडिसिन), डी.एम. (एन्डोक्रीनोलोजी)**

दिनांक ८ जानेवारी २०२३ रविवार रोजी सायंकाळी ७ ते ९ या वेळेत डॉ. निलेश लोमटे(एम.डी. (मेडिसिन), डी.एम. (एन्डोक्रीनोलोजी) यांनी मधुमेह, रक्तदाब व आरोग्य याविषयी उपस्थितांना मार्गदर्शन केले. आज मानवी जीवनशैली बदलली आहे. शहरी सुख – सुविधामुळे श्रम कमी होत आहेत. याबरोबरच मानसिक ताणतणाव मात्र वाढत चाललेला आहे. अशा विविध कारणामुळे मधुमेह, रक्तदाब याचे प्रमाण वाढत आहे. बदलत्या पर्यावरणामुळे आरोग्याच्या विविध समस्या वाढत चाललेल्या आहेत. यावर उपाय म्हणून नियमित व्यायाम करणे. योग्य व संतुलित आहार घेणे आवश्यक आहे. अशा प्रकारे मधुमेह व रक्तदाब याला नियंत्रित ठेवण्यासाठी काय काळजी घ्यावी याविषयी डॉ. निलेश लोमटे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

त्यानंतर डॉ. निलेश लोमटे यांनी उपस्थितनागरिक व रुग्ण यांचे मधुमेह व रक्तदाब याची तपासणी केली.




**डॉ. निलेश लोमटे यांनी मधुमेह, रक्तदाब व आरोग्य याविषयी उपस्थितांना मार्गदर्शन करताना.**




सरपंच सौ.सरलाताई संतोष तांदळे आपले मनोगत व्यक्त करताना.



डॉ. निलेश लोमटे व त्यांचे सहकारी नागरिक व रुग्ण यांचे मधुमेह व रक्तदाब याची तपासणी करताना.



**डॉ. निलेश लोमटे व त्यांचे सहकारी नागरिक  व रुग्ण यांचे मधुमेह व  रक्तदाब याची तपासणी करताना.**



**डॉ. निलेश लोमटे व त्यांचे सहकारी नागरिक  व रुग्ण यांचे मधुमेह व  रक्तदाब याची तपासणी करताना.**

**बौद्धिक सत्र- दिनांक ९ जानेवारी २०२३ सोमवार  वेळ: दुपारी ३ ते ४**

**विषय :- संवाद कौशल्य आणि व्यक्तिमत्व**

**वक्ते : प्रा. डॉ . कैलास इंगळे**

**अध्यक्ष:-प्रा. डॉ. संजीवकुमार पांचाळ**

दिनांक ९ जानेवारी २०२३ सोमवार रोजी दुपारी ३ ते ४  या वेळेत बौद्धिक सत्रात डॉ. कैलास इंगळे (राजर्षी शाहू महाविद्यालय पाथ्री) यांनी ‘संवाद कौशल्य आणि व्यक्तिमत्व’ या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. मानवी जीवनात प्रत्येक समुदायाचे वेगळेपण आहे. प्रत्येक समुदायाची एक भाषा आहे. आपल्या आजच्या विकासात पुर्वजांचे खूप मोठे योगदान आहे . पूर्वजांनी आपल्याला दिलेल्या अनेक गोष्टी पैकी भाषा ही एक मोठी देणगी आहे. आपल्याला संवाद साधता आला पाहिजे. संवादामुळे व्यक्तीमत्वचा विकास होतो. संवादामुळे रोजगार उपलब्ध होतो. बोलणाऱ्याची अंबाडी विकते, न बोलणाऱ्याचे गहू सुध्दा विकत नाहीत असे म्हटले जाते. संवाद कौशल्य असेल तर नेतृत्व करता येते. संवाद साधताना शब्दांची ताकद महात्वाची असते. शब्दांची मांडणी करून

गीत रचना करता येते. आपली लढाई स्वतः शी असते. आपण आपल्यात हवा तसा बदल करायला हवा. जगात कर्तत्ववान मानसाला कमी आयुष्य मिळाले आहे. आपण स्वतःला ओळखले पाहिजे. स्वतः करा मग दुसऱ्याला सांगा. सकारात्मक विचारांची ताकद आपल्यकडे असली पाहिजे. आपल्याला संधी भरपूर उपलब्ध आहेत. त्या शोधल्या पाहिजेत. आपला स्वतः वर विश्वास असला पाहिजे. आपण स्वतःला ओळखा. इतरासाठी व समाजासाठी काही करता येईल का ते पहा.  चांगल्या संवादामुळे मानसे जोडली  जातात. बोलत असताना शब्द तोलून- मापून वापरणे गरजेचे आहे. अशा प्रकारे डॉ. कैलास इंगळे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.  कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप डॉ. संजीवकुमार पांचाळ यांनी केला. सूत्रसंचालन श्री कृष्णा शिंदे यांनी तर आभार श्री रोहन बनसोडे यांनी मानले.




**डॉ. कैलास इंगळे यांचे स्वागत करताना स्वयंसेवक श्री बाविश जाधव.**



**बौद्धिक सत्रात मार्गदर्शन करताना  डॉ. कैलास इंगळे.**



**कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप करताना डॉ. संजीवकुमार पांचाळ**

**व्याख्यान सत्र-दिनांक ९ जानेवारी २०२३ सोमवार वेळ: सायं. ७ ते ८:३०**
**विषय :- सत्यशोधकी भारुड (जनजागृती)**
**वक्ते :- प्रा. अनिल मगर**

दिनांक ९ जानेवारी २०२३ सोमवार रोजी सायंकाळी ७ ते ८:३० या वेळेत प्रा. अनिल मगर, राजश्री शाहू महाविद्यालय, पारध यांनी सत्यशोधकी भारुड हा जनजागृती कार्यक्रम सदर केला. कार्यक्रमाच्या प्रारंभी त्यांनी समाजाच्या विकासासाठी शिक्षण हे कसे महत्त्वाचे आहे या विषयी आपले विचार मांडले. अनेक महात्मे, संत यांच्या कार्याची माहिती दिली. संत गाडगेबाबा, संत तुकडोजी महाराज यांच्या सामाजिक कार्यावर प्रकाश टाकला. त्यानंतर अंधश्रद्धा, हुंडाबंदी, स्त्री-पुरुष समानता व शिक्षण प्रसार अशा विविध विषयावर त्यांनी भारुडाच्या माध्यमातून जागृती करण्याचा प्रयत्न केला. कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप श्री पांडुरंग अंभोरे यांनी केला.



**प्रा. अनिल मगर समाज प्रबोधन विचार मांडताना.**



**सत्यशोधकी भारुड हा जनजागृती कार्यक्रम – उपस्थित गावकरी.**



**प्रा. अनिल मगर सत्यशोधकी भारुड हा जनजागृती कार्यक्रम सादर करताना.**



**प्रा. अनिल मगर सत्यशोधकी भारुड हा जनजागृती कार्यक्रम सादर करताना.**



**प्रा. अनिल मगर सत्यशोधकी भारुड हा जनजागृती कार्यक्रम सादर करताना.**

**बौद्धिक सत्र- दि.१० जानेवारी २०२३ मंगळवार वेळ: दुपारी ३:०० ते ३:४५ वा.**

**विषय:- बालमजुरी**

**वक्त्या :- डॉ.मंजुषा नळगीरकर**

दिनांक १० जानेवारी २०२३ मंगळवार रोजी दुपारी ३:०० ते ३:४५ या वेळेत बौद्धिक सत्रात डॉ. मंजुषा नळगीरकर (समाजशास्त्र विभागप्रमुख, श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय फुलंब्री) यांनी 'बालमजुरी' या विषयावर व्याख्यान दिले. बालकांकडून काम करून घेणे म्हणजे बालमजुरी होय. बालमजूर म्हणजे 14 वर्षे वयाखालील कामाला लावली जाणारी मुले व मुली होय. भारतात 1986 मध्ये बालमजुरी प्रतिबंधक कायदा करण्यात आला आहे. पाच ते चौदा वर्षे या वयादरम्यान वय असलेल्या बालकांना कामाला लावले जाते. बालमजुरीची अनेक कारणे आहेत. कुटुंबाची आर्थिक स्थिती दुर्बल असणे. पालक नसणे किंवा एकच पालक असणे. अशी बालमजुरीची अशी अनेक करणे आहेत. बाल वयात मुलांचा शारीरिक व बौद्धिक विकास होणे आवश्यक आहे. बालके हे राष्ट्राची संपत्ती आहेत.बालवयात मुलांना शिक्षणाची संधी मिळणे आवश्यक असते. परंतु काही बालकांना शिक्षणापासून वंचित राहावे लागते. त्यांचा विकास होत नाही. बालमजुरी कायदे असून सुद्धा अनेक ठिकाणी बालकांना कामावर पाठविले जाते. बालमजुरी विषयी समाजात जाणीव जागृती केल्यास बालमजुरी कमी होऊ शकते. असे मत प्रा.डॉ. मंजुषा नळगीरकर यांनी व्यक्त केले.




**बौद्धिक सत्रात डॉ. मंजुषा नळगीरकर 'बालमजुरी' या विषयावर व्याख्यान देताना.**

**बौद्धिक सत्र- दि.१० जानेवारी २०२३ मंगळवार वेळ: दुपारी ३:४५ ते ४:३०वा.**

**विषय:- ‘बाल विवाह प्रतिबंध’**

**वक्ते:- प्रा. विजय पांडे**

दिनांक १० जानेवारी २०२३ मंगळवार रोजी दुपारी ३:४५ ते ४:३० या वेळेत बौद्धिक सत्रात प्रा. विजय पांडे यांनी ‘बाल विवाह प्रतिबंध’ या विषयावर व्याखान दिले. भारतात अनेकदा बालविवाह होताना दिसतात. भारतीय संस्कृती जगापेक्षा वेगळी आहे. भारतीय कुटुंबातील वेगळेपण म्हणजे विवाह संस्था ही आहे. प्रत्येक समाजामध्ये विवाहाचे वेगवेगळे प्रकार आहेत. त्यापैकी एक बालविवाह आहे. काही बालविवाह आयोजित केले जातात. तसेच काही बालविवाह प्रेमसंबंधातून झालेले आढळून येतात. भारतातील सध्याच्या कायद्यानुसार मुलीचा विवाह वयाची १८ वर्षे पूर्ण झाल्यानंतर आणि मुलाचा विवाह वयाची २१ वर्षे पूर्ण झाल्यानंतर करणे आवश्यक आहे. अठरा वर्षे वयाच्या खाली वय असलेल्या वधू किंवा वर यांच्या विवाहाला बालविवाह असे म्हणतात. बालविवाहाच्या अनेक घटना घडत आहेत. मुलींना पळवून नेऊन बालविवाह लावले जात आहेत. आर्थिक परिस्थिती दुर्बल असल्यामुळे सुद्धा बालविवाह होत आहेत. बालविवाह होण्यामागे आणखी एक कारण आहे ते म्हणजे मुलींची संख्या कमी होणे. बालविवाह रोखण्यासाठी आपण प्रयत्न करणे गरजेचे आहे. बालविवाहाचे अनेक दुष्परिणाम आहेत. बालविवाहामुळे मुली बालमाता बनतात. त्यांचा शारीरिक विकास पूर्ण झालेला नसल्यामुळे आरोग्याच्या अनेक समस्या निर्माण होतात अशा प्रकारे बालविवाहाचे अनेक कारणे व परिणाम आहेत.




**प्रा. विजय पांडे यांनी ‘बाल विवाह प्रतिबंध’ या विषयावर व्याखान देताना.**

**१० जानेवारी २०२३ मंगळवार रोजी व्याख्यान सत्र**

**वेळ: सायं. ७ ते ८:३०**
**विषय:- जल पुनर्भरण व्यवस्थापन "**
**वक्ते:- श्री विश्वनाथ दहे**

दिनांक १० जानेवारी २०२३ मंगळवार रोजी सायं. ७ ते ८:३० या वेळेत व्याख्यान सत्रात श्री विश्वनाथ दहे (भूसंपादन अधिकारी विशेष घटक, म.न.पा.औरंगाबाद , सहसचिव संत्रा बागायतदार व महाराष्ट्र केशर आंबा संघ) यांनी 'जल पुनर्भरण' या विषयावर व्याख्यान दिले. ते म्हणाले, मी शेतीत अनेक नवीन प्रयोग केले आहेत. आज झाडे कमी झाली आहेत. शेतीत बांध राहिलेले नाहीत, परिणामी पडलेले पाणी वाहून जाते. जेव्हा माणूस समस्यात सापडतो तेव्हा काहीतरी नवीन शोधण्याचा प्रयत्न करीत असतो. मी विहिरीजवळ 30 बाय 30 फूट आकाराचे शेततळे करून त्यात नाल्याचे पाणी सोडले. जमिनीत पाणी जिरविण्याचा प्रयत्न केला.त्याचा खूप फायदा झाला. मुरमाड जमीन पाणी ओढून घेते. उंच जमिनीकडील पाणी सकल भागाकडे वाहते.




**श्री विश्वनाथ दहे 'जल पुनर्भरण' या विषयावर व्याख्यान देताना.**

जल पुनर्भरण करण्याबरोबरच पाण्याचा वापर सुद्धा योग्य पद्धतीने झाला पाहिजे. शेतकऱ्यांनी आपले 30% क्षेत्र हे फळबागेसाठी राखून ठेवले पाहिजे. फळबाग करताना दक्षिणोत्तर रांगा लावाव्यात त्यामुळे सूर्यकिरण सर्व झाडावर पडतात. रोगराई कमी होते झाड लावताना खड्डा जर तीन बाय तीन फुटाचा करून त्यात पालापाचोळा टाकावा. खड्ड्याच्या वर दीड फूट माती टाकावी. जेसीबीने चर खोदावा व त्यात पालापाचोळा टाकावा. फळझाडाला ठिबकने पाणी द्यावे. बँकेतला पैसा वापरल्याप्रमाणे पाणी वापरावे. झाडांची कटिंग करून आठ-दहा फूट उंचीचे झाड ठेवावे. फळझाडाच्या रांगेत आंतरपीक घेता येते. द्विदल पिके घेतल्यास जमिनीत खत वाढते. फळझाडांचे खोड मजबूत करावयाचे असेल तर शेंडा कापावा लागतो. आंब्याच्या झाडाचे रोप दीड फुटावर कापावे, तीनच फांद्या राखाव्यात, त्या तीन फांद्यांना वर प्रत्येकी तीन फांद्या राखाव्यात, त्या फांद्यांना पुन्हा तीन फांद्या ठेवाव्यात म्हणजे 27 फांद्या होतील. दुसऱ्या वर्षापासून आंब्याचे एकरी तीन लाख रुपये उत्पन्न मिळू शकते. आपण

बँकेत पैसे टाकतो तेव्हाच आपण काढू शकतो या पद्धतीने पाण्याचा वापर केला पाहिजे असे मत श्री विश्वनाथ दहे यांनी व्यक्त केले. त्यांनी आपल्या शेतात राबविलेले अनेक प्रयोग व अनुभव या ठिकाणी सांगितले.




**कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप करताना श्री पांडुरंग अंभोरे.**

**बौद्धिक सत्र-दिनांक ११ जानेवारी २०२३ बुधवार वेळ: दुपारी ३ ते ३:४५ वा.**
**विषय;-'अन्न सुरक्षा'**
**वक्ते - डॉ. पांडुरंग कल्याणकर**

दिनांक 11 जानेवारी 2023 रोजी दुपारी ३ ते ३:४५ या वेळेत डॉ. पांडुरंग कल्याणकर यांनी 'अन्नसुरक्षा' या विषयावर व्याख्यान दिले. भारतात पूर्वी अनेक दुष्काळ पडले होते. याबरोबरच देशात अन्नाचे उत्पादन कमी होते. देशातील सर्व जनतेला सशक्त आयुष्याकरता आहारविषयक गरज पुर्ण होणे गरजेचे आहे. प्रत्येक व्यक्तीला सदा सर्वकाळ पुरेशा प्रमाणात सकस आहार उपलब्ध असणे आवश्यक आहे. अन्न घेण्यासाठी आर्थिक स्थिती सक्षम असणे म्हणजे अन्नसुरक्षा होय, अशी संयुक्त राष्ट्र संघटनेने अन्न सुरक्षेची व्याख्या केलेली आहे. अन्नसुरक्षेसाठी शासनाने 2013 मध्ये कायदा केला आहे. शासन सार्वजनिक वितरण प्रणाली चालवते. अंगणवाडी व शाळांमध्ये पोषक आहार दिला जातो हा अन्नसुरक्षेचाच एक भाग आहे. भारतात लोकांना पुरेशे अन्न उपलब्ध व्हावे यासाठी स्वातंत्र्यानंतर भारत सरकारने अनेक प्रयत्न केलेले आहेत. त्यातून हरितक्रांती व श्वेतक्रांती झालेली आहे. त्यामुळे वाढत्या लोकसंख्येला लागणारे अन्न पुरेशा प्रमाणात उपलब्ध होत आहे. गहू व तांदूळ यांच्या उत्पादनाबाबत भारत स्वावलंबी बनलेला आहे.




डॉ. पांडुरंग कल्याणकर 'अन्नसुरक्षा' या विषयावर व्याख्यान देत आहेत.

**बौद्धिक सत्र-दिनांक ११ जानेवारी २०२३ बुधवार दुपारी ३:४५ ते ४:३० वा.**

**विषय;- 'कुपोषण' -**

**वक्ते - श्री बाबासाहेब दाभाडे**

दिनांक 11 जानेवारी 2023 रोजी दुपारी ३:४५ ते ४:३० या वेळेत श्री बाबासाहेब दाभाडे यांनी 'कुपोषण' या विषयावर व्याख्यान दिले.भारतात कुपोषण ही एक गंभीर समस्या आहे. कुपोषण टाळण्यासाठी पुरेशे व सकस अन्न आवश्यक आहे. कुपोषण टाळण्यासाठी आरोग्य विषयक शिक्षण सुद्धा आवश्यक आहे. प्रत्येक व्यक्तीचे शरीर सुदृढ असणे आवश्यक आहे. देशातील कुपोषण टाळण्यासाठी अन्नसुरक्षा महत्त्वाची आहे. अशा प्रकारे श्री बाबासाहेब दाभाडे यांनी बौद्धिक सत्रात मार्गदर्शन केले.



**व्याख्यान सत्र- दिनांक 11 जानेवारी 2023 वेळ: सायं. ७ ते ८:३०**
**विषय;-" आत्मनिर्भर गाव, आत्मनिर्भर देश "**
**वक्ते;- प्राचार्य डॉ. सर्जेराव ठोंबरे**

दिनांक 11 जानेवारी 2023 रोजी सायं. ७ ते ८:३० या वेळेत प्राचार्य डॉ. सर्जेराव ठोंबरे यांनी " आत्मनिर्भर गाव, आत्मनिर्भर देश " या विषयावर व्याख्यान दिले. या वेळी बोलताना ते म्हणाले, शिबिरात सहभागी विद्यार्थी अनेकांशी जुळवून घेत असतात. येथील वातावरणाशी जुळवून घेत असतात. येथील पशुपक्षी, वातावरण, फळे व फुले यांच्याशी जुळवून घेत असतात. शिबिरात अनेक गोष्टी शिकत असतात. समूहासोबत जुळवून घ्यावे लागते. प्रभू रामचंद्र 14 वर्षे वनवासात राहिले वशिष्ठ ऋषीच्या गुरुकुलात रामाला शिक्षण मिळाले होते. रामाचे निसर्ग प्रेम अप्रतिम होते. पशु पक्षी वन्यजीव चराचर यांची काळजी घेतली जात होती. कर्मामध्ये देव आहे, कर्म चांगले असले पाहिजे. औपचारिक शिक्षणासोबत आपण अनुभूती घेणे आवश्यक आहे. जीवन कौशल्य, श्रम प्रतिष्ठा महत्त्वाची आहे. आज शेतकऱ्याइतके कौशल्य कोणाकडेही नाही. प्रत्येकाला कोणते तरी कौशल्य आले पाहिजे. कौशल्याच्या आधारे व्यवसाय करता येतो. आपले कल्याण आपणच करणार आहोत. त्यातून आपला गाव आपला देश आत्मनिर्भर होईल. तसेच वस्तू बाहेर देशातून आणण्याची गरज भासणार नाही, असे मत प्राचार्य डॉ. सर्जेराव ठोंबरे सर व्यक्त केले. या सत्राच्या अध्यक्षा व गणोरी गावच्या सरपंच सौ. सरलाताई तांदळे यांनी अध्यक्षीय समारोप केला. यावेळी व्यासपीठावर श्री विलास न्यायाधीश व श्री पांडुरंग अंभोरे हे उपस्थित होते.




**प्राचार्य डॉ. सर्जेराव ठोंबरे सर व्याख्यान देताना, व्यासपीठावर सरपंच सौ. सरलाताई तांदळे,श्री न्यायधीश साहेब, श्री पांडुरंग आंभोरे.**



प्राचार्य डॉ. सर्जेराव ठोंबरे सर व्याख्यान देताना,




प्राचार्य डॉ. सर्जेराव ठोंबरे सर व्याख्यान देताना,




**सरपंच सौ. सरलाताई संतोष पा. तांदळे, अध्यक्षीय समारोप करताना.**

**समारोप समारंभ - दिनांक १२ जानेवारी २०२३ गुरुवार**
**वेळ: सकाळी ११:०० वाजता**

दिनांक १२ जानेवारी २०२३ गुरुवार रोजी दुपारी १२:३० ते ३:०० या वेळेत राष्ट्रीय सेवा योजना शिबिराचा समारोप समारंभ संपन्न झाला. समारोप समारंभाला प्रमुख अतिथी म्हणून प्रा. डॉ. ज्ञानेश्वर पाथ्रीकर (राष्ट्रीय सेवा योजना,जिल्हा समन्वयक) सौ. अनुराधाताई चव्हाण (माजी सभापती महिला व बाल कल्याण समिती जि. प.), सरपंच सौ. सरलाताई संतोष पा. तांदळे, श्री संतोष पा. तांदळे, प्राचार्य डॉ. सुभाष टकले हे व्यासपीठावर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी राष्ट्रमाता जिजाऊ जयंती व स्वामी विवेकानंद जयंती निमित्त अभिवादन कार्यक्रम घेण्यात आला.

त्यानंतर प्रा. डॉ. ज्ञानेश्वर पाथ्रीकर यांनी राष्ट्रीय सेवा योजना शिबिराविषयी गावकरी व स्वयंसेवक यांना मार्गदर्शन केले. प्रा. डॉ. ज्ञानेश्वर पाथ्रीकर म्हणाले, राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून गाव दत्तक घेणे हे एक आव्हनात्मक कार्य झाले आहे. गावातील लोकांनी सुद्धा राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांना मदत करणे गरजेचे आहे. गावाकडून सुद्धा विद्यार्थ्यांनी काहीतरी शिकले पाहिजे. आज अनेक समस्या वाढत आहेत. आपण दररोज वर्तमानपत्रात अनेक वाईट घटना पाहतो. आई-वडील मुलींना शिबिराला पाठवण्यासाठी तयार होत नाहीत. आज ऑनलाईन परीक्षा होऊन उत्तीर्ण होणाऱ्यांचे प्रमाण वाढले आहे. आपण मोबाईलचा वापर चांगला केला पाहिजे. मोबाईल वाईट नाही त्याचा वापर चांगला करण्याची गरज आहे. राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे प्रतिक असलेल्या चक्रातील रंगाचे विश्लेषण त्यांनी केले. चक्र हे क्रियाशील व गतिशील असण्याचे प्रतीक आहे. चक्रातील लाल रंग हे रक्ताचे म्हणजे धैर्याचे प्रतीक आहे. आपण समाजसेवेचे कार्य करत रहावे. समाजसेवेचे कार्य हे स्वतःच्या कुटुंबातील कार्य आहे असे समजून करावे असे विचार त्यांनी व्यक्त केले. त्यानंतर सरपंच सौ.सरलाताई तांदळे यांनी आपले विचार व्यक्त केले. गाव स्वच्छ करण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजना शिबीरातील स्वयंसेवकांनी गावात

स्वच्छतेचा संदेश दिला. हे शिबीर आपण यशस्वी करण्यासाठी प्रयत्न केले. आई-वडिलांनी मुलावर विश्वास ठेवला पाहिजे. आई-वडिलांना संदेश दिला पाहिजे की आम्हाला थोडं स्वातंत्र्य द्या. आपण सुद्धा विश्वासाला पात्र राहून काम केले पाहिजे असे मत व्यक्त केले.

ग्रामपंचायत सदस्य सौ. सीमा उबाळे म्हणाल्या, आपल्या मुलांना शिकविण्यासाठी प्रेरणा राष्ट्रमाता जिजाऊ यांच्याकडून मिळते. आपले गाव दत्तक घेतले त्याबद्दल त्यांनी आभार व्यक्त केले.

समारोप सत्राचा अध्यक्षीय समारोप सौ. अनुराधाताई चव्हाण यांनी केला. आपल्या महाविद्यालयातून खरोखरच शिस्तबद्ध कार्य केले जाते. आज समाजात अनेक समस्या उद्भवत आहेत. समाजातील समस्या कोणी सोडवायच्या हा प्रश्न आहे. गावात विद्यार्थी काम करत आहेत याची प्रेरणा गावकरी घेतील. महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी येथे काम दाखवून दिले आहे. केवळ पदवी घेऊन काहीही उपयोग नाही. आपण सर्व अनुभवातून गेलेले असाल तरच जीवनात यशस्वी होऊ शकतो. आज नोकरी देताना पारदर्शकता निर्माण झालेली आहे. विद्यार्थी सक्षम होणे गरजेचे आहे. विद्यार्थ्यांना नोकरीसाठी मुलाखत द्यावी लागते. त्यात सामाजिक कार्यामधील सहभाग पाहिला जातो. पुस्तकातून शिक्षण तर घ्यावेच पण व्यावहारिक ज्ञान सुद्धा घेणे गरजेचे आहे. आपण स्वच्छता व रंग रंगोटी करण्याचा खूप चांगला उपक्रम घेतला आहे. हे कार्य प्रत्येक गावापर्यंत पोहोचले जावे अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. आज आपण शिबिरासाठी खूप महत्त्वाचा दिवस निवडला आहे. समारोपचा दिवस १२ जानेवारी हा राष्ट्रमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद या दोन महान व्यक्तीचा जन्मदिन आहे. अशा शब्दात सौ.अनुराधाताई चव्हाण यांनी आपले विचार व्यक्त केले आणि शिबिराची सांगता झाली. या समारोपत्राचे सूत्रसंचालन श्री चंद्रमणी बनसोडे यांनी केले तर आभार कु.ऋतुजा अंभोरे यांनी मानले.




**राष्ट्रमाता जिजाऊ जयंती व स्वामी विवेकानंद जयंती निमित्त अभिवादन करताना अतिथी.**




**प्रा. डॉ. ज्ञानेश्वर पाथ्रीकर यांनी राष्ट्रीय सेवा योजना शिबिराविषयी मनोगत व्यक्त केले.**




**स्वयंसेवक श्री चंद्रमुनी बनसोडे याने राष्ट्रीय सेवा योजना शिबिराविषयी मनोगत व्यक्त केले.**



**ग्रामपंचायत सदस्य सौ. सीमा उबाळे शिबिर समारोप प्रसंगी मनोगत व्यक्त करताना.**



**अध्यक्षीय समारोप करताना सौ. अनुराधाताई चव्हाण.**



**अतिथींच्या हस्ते स्वयंसेवकांना प्रमाणपत्र वाटप करण्यात आले.**




**अतिथींच्या हस्ते स्वयंसेवकांना प्रमाणपत्र वाटप करण्यात आले.**



**अतिथींच्या हस्ते स्वयंसेवकांना प्रमाणपत्र वाटप केल्यानंतर सामुहिक फोटो.**

**दिनांक ६ जानेवारी २०२३ पासून ते दिनांक १२ जानेवारी २०२३ राष्ट्रीय सेवा योजना शिबीर कालावधीत मौजे गणोरो गावात स्वयंसेवकांनी दररोज सकाळी ग्राम स्वच्छता केली. त्यानंतर अल्पोपहार करून दुपारी पर्यंत श्रमदान केले. त्याची छायाचित्र.**



**गणोरी गावात सार्वजनिक ठिकाणी स्वच्छता करताना स्वयंसेवक**





गणोरी गावात सार्वजनिक ठिकाणी स्वच्छता व  रंग-रंगोटी करताना स्वयंसेवक



गणोरी गावात सार्वजनिक ठिकाणी स्वच्छता करताना स्वयंसेवक



गणोरी गावात सार्वजनिक ठिकाणी स्वच्छता, सुशोभीकरण व  रंग-रंगोटी करताना स्वयंसेवक



गणोरी गावात सार्वजनिक ठिकाणी स्वच्छता, सुशोभीकरण व  रंग-रंगोटी करताना स्वयंसेवक



सुंदर गाव – स्वच्छ गाव उपक्रम राबविला



गणोरी गावात सार्वजनिक ठिकाणी वृक्षाना  रंग देताना स्वयंसेवक



गणोरी गावात वेशीतील कमानीची  रंग-रंगोटी करताना स्वयंसेवक



गणोरी गावात वेशीतील कमानीची रंग-रंगोटी करताना स्वयंसेवक



गणोरी गावात स्वच्छता करताना स्वयंसेवक



गणोरी गावात सार्वजनिक ठिकाणी स्वच्छता, सुशोभीकरण व  रंग-रंगोटी करताना स्वयंसेवक



गणोरी गावात सार्वजनिक ठिकाणी सुशोभीकरण व  रंग-रंगोटी करताना स्वयंसेवक

 

गणोरी गावात सार्वजनिक ठिकाणी सुशोभीकरण व  रंग-रंगोटी करताना स्वयंसेवक



गणोरी गावात सार्वजनिक ठिकाणी सुशोभीकरण व  रंग-रंगोटी करताना स्वयंसेवक



गणोरी गावात सार्वजनिक ठिकाणी सुशोभीकरण व  रंग-रंगोटी करताना स्वयंसेवक



गणोरी गावात सार्वजनिक ठिकाणी रंग-रंगोटी करताना स्वयंसेवक

 

गेन्दाई समाधी स्थळ –गेन्दाई  गडावर कचरा संकलित करताना स्वयंसेवक

==============

सादरकर्ते

| कार्यक्रमाधिकारी | सहाय्यक कार्यक्रमाधिकारी | प्राचार्य |
|---|---|---|
| प्रा. डॉ. रामकिशन लोमटे | डॉ. राजश्री पवार | डॉ.सुभाष टाकले |